**File No.PBN-18021(11)/36/2019-PBN-DPO-COLLECTOR OFFICE-PARBHANI**

# जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com

संदर्भ: 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.जिवायो/1007/प्र.क्र.39/का-1444, दि.16.2.2008
2. कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे पत्र क्र.जिग्राप्र-1118/प्र.क्र.71/ योजना-5, दि.21.06.2018
3. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. परभणी यांचे निधी मागणी पत्र क्र.जि.ग्रा.वि.यं./संनि/936/2018, दि.04.06.2018
4. उपआयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र क्र.2018/विशा/नियो-2/प्रक्र 446/कावि, दि.26.08.2018
5. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.परभणी यांचे निधी मागणी पत्र क्र.जि.ग्रा.वि.यं./संनि/1140/2018, दि.04.07.2018
6. या कार्यालयाचे निधी वितरण आदेश क्र.जिनिस/जिवायो-2018-19/नि.वि./1350, दि. 30.07.18
7. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.परभणी यांचे निधी मागणी पत्र क्र.जि.ग्रा.वि.यं./संनियंत्रण/1232/2019, दि. 25.02.2019

---

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/ जि.ग्रा.वि.यं/नि.वि./का.क्र.1/ 658 दि. 28 फेब्रुवारी, 2019

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2018-19 अंतर्गत निधी वितरण आदेश**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2018-19 अंतर्गत 'जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला प्रशासन अनुदान' या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी रु.56.92 लाखांची तरतूद मंजूर व अर्थसंकल्पीत झालेली आहे. तसेच सदरील योजनेसाठी पुनर्विनियोजनाव्दारे रु. 66.00 लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामुळे सदर योजनेची सुधारीत तरतूद रु.122.92 लक्ष एवढी आहे.

प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.परभणी यांनी संदर्भ 5 अन्वये पुनिर्विनियोजनाव्दारे उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीची निधीची मागणी केलेली आहे. तसेच संदर्भ 2 अन्वये शासनाने निधी वितरणाबाबत निर्देश दिलेले आहेत त्यास अधिन राहून व उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी जिल्हाधिकारी परभणी या आदेशान्वये खालील तपशिलाप्रमाणे **रु.66.00 लक्ष (अक्षरी रुपये सहासष्ट लक्ष फक्त)** निधी वितरीत करण्यात येत आहे.

सदर निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, परभणी यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ.क्र | योजनेचे नाव | लेखाशिर्ष नियोजन विभाग मागणी क्रमांक ओ - 50 (महसुली) | मंजूर तरतूद | पुनर्विनियोजना नतरची सुधारीत तरतूद | यापूर्वी वितरीत निधी | या आदेशान्वये वितरीत निधी | एकूण वितरीत निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | 6 | 7 |
| | **कार्यान्वयीन यंत्रणा - प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.परभणी** | | | | | | |
| 1 | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला प्रशासन अनुदान | (2515 2181) 31 - सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) | 56.92 | 112.92 | 56.92 | 66.00 | 112.92 |
| **एकूण** | | | 56.92 | 112.92 | 56.92 | 66.00 | 112.92 |

**(अक्षरी रुपये सहासष्ट लक्ष फक्त)**

## अटी व शर्ती

1. सदर कामाची/योजनेची अंमलबजावणी आपल्या प्रशासकीय विभागाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना/निकषानुसारच करण्यात यावी तसेच शासन स्तरावर मंजुर केलेल्या कामाची व्दिरुक्ती होणार नाही व सदरीचे काम अनुज्ञेय असल्याची खात्री करुनच सदर काम अनुज्ञेय असल्यासच कामास सुरुवात करावी.

**2. केंद्र पुरस्कृत योजनेसाठी वरील प्रमाणे वितरीत करण्यात आलेल्या राज्य हिश्याच्या निधीस अनुसरून केंद्र हिश्याचा निधी उपलब्ध करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील तसेच केंद्र शासनाचा हिस्सा प्राप्त होईल त्या प्रमाणात आणि योजनांच्या वितीय हिश्याच्या प्रमाणात जिल्हा योजनांचा निधी खर्च करावा या अटीवरच राज्य हिश्याचा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सदर निधी खर्च करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच निकषांनुसारच खर्च करण्यात यावे.**

## File No.PBN-18021(11)/36/2019-PBN-DPO-COLLECTOR OFFICE-PARBHANI

3. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेला निधी चालू आर्थिक वर्ष 2018-19 अखेरीस अखर्चित राहिल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची राहील.

4. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेला आहे त्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावा इतर कोणत्याही योजनावर / कामावर खर्च करण्यात येवू नये.

5. या योजनेतंर्गतच्या कामांना आवश्यक असलेली प्रशासकीय मान्यता/तांत्रीक मंजूरी सक्षम प्राधिकाऱ्याकडून घेतल्यानंतरच निधी खर्च करावा. निधी वितरीत करण्यात आलेल्या योजना/कामांना प्रशासकीय मान्यता/तांत्रीक मान्यता घेण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची राहील.

6. सदरील सहाय्यक अनुदानाची उपयोगीता प्रमाणपत्रे व पुर्णत्वाचे दाखले महालेखापाल कार्यालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी. तसेच या योजनांवर झालेल्या खर्चाचे महालेखापाल यांचे कार्यालयात नोंद झालेल्या खर्चाशी ताळमेळ घालुन त्याची एक प्रत या कार्यालयास सादर कराव्यात.

7. उपरोक्त योजनांचा त्रयस्थ यंत्रणे मार्फत मुल्यमापन करण्यात येवू शकते तेव्हा या योजनेतंर्गत होणाऱ्या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि दरमहा 5 तारखेपुर्वी या कार्यालयास प्रगती अहवाल सादर करावा.

8. आवश्यक असलेल्या कामाबाबत निविदा मागविणे, स्वीकृत करणे तसेच खरेदी बाबतचे सर्व अधिकार प्रचलित पध्दतीनुसार राहतील.

9. योजनेच्या अंमलबजावणीवर, खर्चावर व तांत्रीक बाबीवर संबधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे नियंत्रण राहील.

10. या योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप लोकलेखा समिती, विधीमंडळ कामकाज इत्यादी बाबीसाठी संबधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

11. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीचा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

**लेखाशिर्ष - नियोजन विभाग - मागणी क्रमांक ओ - 50 (महसुली)**
2515, इतर ग्रामविकास कार्यक्रम
00, 104, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रशासन
(49) जिल्हा योजना - परभणी
(49)(01) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला आस्थापना खर्चासाठी सहाय्यक अनुदान (2515 2181)
31 - सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

1. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना कार्यवाहीस्तव.
2. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. परभणी यांना कार्यवाहीस्तव
3. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी
4. महालेखापाल नागपूर 2

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

Signature valid

Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.02.28 16:45:21 IST
Reason: Approved